01:21:24 PM

नि.दि. दावा क्र.३५/२०१७
धीरजकुमा वि. शिवाजी
निशाणी क्र. २३ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्रं. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विधिज्ञ श्री. निंभोरकर यांच्यामार्फत**

१४. माझे शिक्षण बारावीपर्यंत झालेले आहे. बाबुलाल व जगन ही किसनची मुले आहेत. हे खरे आहे की, जगनला पुनमचंद नावाचा एक मुलगा आहे. हे खरे आहे की, बाबुलाल यांना लक्ष्मणदास व सुभाष अशी दोन मुले आहेत. हे खरे आहे की, लक्ष्मणदास यांची पत्नी उमाबाई ही माझी आई आहे. मला चार बहिणी आहे. ज्योती, चंदा, किरण व गंगा अशी त्यांची नावे आहेत. रचना माझ्या काकांची मुलगी आहे. हे खरे आहे की, ज्यावेळेस मृत्युपत्र झाले त्यावेळेस माझे वय जवळपास तीन ते चार वर्ष होते.

१५. हे मला सांगता येणार नाही, माझ्या आजोबा यांच्याकडे दावा मिळकत ही कशी आली होती. हे खरे आहे की, दावा मिळकतीचा जुना क्रमांक १४० ते १५८ असा होता. हे खरे आहे की, त्यानंतर त्यांचा क्रमांक ३/२८६ व ३/२८७ असा झाला. सदर मिळकती माझ्या आजोबांकडे कशा आल्या याबाबत मी आजपर्यंत चौकशी केली नाही. दि.३१.०३.१९८२ चे मृत्युपत्र मी वाचलेले आहे. हे खरे आहे की, सदर मृत्युपत्रामध्ये असे लिहिलेले आहे की, माझे मृत्युनंतर सदर मिळकत वरील माझा नातु धिरजकुमार लक्ष्मणदास व सुन उमाबाई लक्ष्मणदास पिरथाणी यांना मिळेल व तेच त्याचे पुर्ण मालक होती असे लिहिलेले आहे.
प्रश्नः उमाबाईचे वारस म्हणुन त्यांच्या चारही मुली वारस आहेत किंवा नाही ?
उत्तरः मृत्युपत्रानुसार नाही.

हे खरे आहे की, मी दाव्यामध्ये माझ्या सख्ख्या बहिणी यांना पक्षकार केलेले नाही.

१६.		हे खरे आहे की, सध्याच्या परिस्थितीनुसार मृत्युपत्रामध्ये असणाऱ्या संपुर्ण मिळकतीच्या उत्तरेला रस्ता आहे. हे खरे आहे की, सध्या उत्तरेच्या रस्त्यालगत माझे दुकान आहे. हे खरे नाही की, त्याठिकाणी पुर्वी ललवाणी यांचे दुकान होते. हे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या दक्षिणेला साईदास टेलर यांचे दुकान आहे. हे खरे आहे की, त्याच्या दक्षिणेला शिवाजी आघाडे यांचे दुकान व त्याच्या दक्षिणेला कमल नारायण जैस्वाल यांचे दुकान आहे. हे खरे नाही की, त्याच्या दक्षिणेला शोभा निकम यांचे दुकान आहे. त्या ठिकाणी माझी उर्वरित जागा आहे. हे खरे आहे की, त्या उर्वरित जागेच्या दक्षिणेला जिलाणी बेगम हिचे दुकान आहे. हे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर श्रीकृष्ण हॉटेल हे आघाडे यांचे आहे.

**प्रश्नः** त्या ठिकाणी काय आहे ?

**उत्तरः** मला जेव्हापासुन समजते तेव्हापासुन ते दुकान बंदच आहे.

**प्रश्नः** मिळकतीला २० रुपये भाडे होते नंतर ६० रुपये झाले ?

**उत्तरः** ६० रुपयेच होते.

१७.		हे खरे आहे की, वादग्रस्त मिळकत मी दि.२०.०७.२०१२ रोजी अब्दुल जावेद अब्दुल वाहेद यांना विकली होती. हे खरे आहे की, दि.२४.०४.२०१५ रोजी मी सदर मिळकतीचे खरेदीपत्र पुन्हा माझ्या नावे करुन घेतले. हे खरे आहे की, २०१२–१५ या कालावधीमध्ये मी त्या मिळकतीचा मालक नव्हतो. हे खरे आहे की, ज्यावेळेस मी अब्दुल जावेद अब्दुल वाहेद यांना जमीन विकली तेव्हा ते नगरपरिषदचे उपाध्यक्ष होते. मला याची माहिती नाही की, त्यांचे वडील कन्नड नगरपरिषदेचे १५ वर्षे नगरसेवक होते किंवा कसे.

१८.		हे खरे नाही की, मी प्रतिवादी यांच्याविरुध्द दि.१०.०९.२०१५ रोजी नगरपालिकेकडे अर्ज दिला होता. हे खरे नाही की, वाद ग्रस्तजागेच्या येथे शिवाजी आघाडे यांचे विदयुत जोडणी व नळ आहे.

**प्रश्नः** प्रतिवादी १ यांच्याकडुन भाडे वसुल करण्यासाठी तुम्ही प्रयत्न केले का ?

**उत्तरः** मी त्यांच्याकडे तोंडी मागणी करत होतो.

**प्रश्नः** ते काय म्हणायचे ?

**उत्तरः** उडवाउडवीची उत्तरे दयायचे.

**प्रश्नः** तुम्ही भाडे वसुलीसाठी काही कायदेशीर प्रयत्न केले का ?

**उत्तरः** २०१६ साली मी केस टाकली.

१९. हे खरे नाही की, दावा मिळकतीचा मी एकटा मालक नाही. हे खरे नाही की, दि.३१.०३.१९८२ च्या मृत्युपत्राआधारे मी मालक झालेलो नाही. हे खरे नाही की, मी दि.३०.०९.२०१६ रोजीची मी खोटी नोटीस पाठवली. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांनी पाठवलेली नोटीस उत्तर घेण्यास मी नकार दिला होता. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ चा ताबा आजही कायदेशीररित्या दावा मिळकतीत आहे. हे खरे नाही की, दि.३१.०९.२०१६ रोजीच्या नोटीसीद्वारे ताबा मागण्याचा कोणताही अधिकार नाही व मी खोटा दावा दाखल केला आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन

स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.09.19 11:51:55 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १८/०९/२०२४ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कन्नड.

01:54:00 PM